अस्सल सोलापुरी
सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

पाच हजारांची लाच घेताना वरिष्ठ सहाय्यक सापडला जाळ्यात

माळशिरस : माळशिरस पंचायत समितीतील वरिष्ठ सहाय्यक सुंदरराव नागटिळक वय वर्ष ५६ यांना दि २३ फेब्रुवारी रोजी पाच हजाराची लाच घेताना पुणे येथील लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले.

याबाबत मिळालेली माहिती अशी की तक्रारदार यांनी धर्मपुरी येथे सभा मंडपाचे काम घेतले होते ते पूर्ण केले होते केल्यानंतर सदरचे बिल सोलापूर कार्यालयाकडे दाखल केले होते. सदरचे बिल सोलापूर येथून माळशिरस पंचायत समिती कार्यालयाकडे आल्यानंतर काम झाल्याचा दाखला गटविकास अधिकारी यांच्याकडून मिळवून देण्यासाठी वरिष्ठ सहाय्यक सुंदरराव नागटिळक यांनी तक्रारदाराकडे दहा हजार रुपयाची मागणी केली होती. या बाबत तक्रारदार यांनी पुणे येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली होती. त्यानुसार आज पंचायत समिती कार्यालयात दुपारी दोनच्या सुमारास तडजोडी अंती दाखला देण्यासाठी पाच हजाराची रक्कम स्वीकारताना नागटिळक यांना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले या प्रकरणात गटविकास अधिकारी यांची पडताळणी केली असता त्या पडताळणीत काहीही आढळून आले नाही. आरोपी विरोधात सोलापूर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे सदरचा गुन्हा वर्ग करण्यात येणार आहे.

सदरची कारवाई पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक खंडेराव रंजवे,लेडीज पोलीस कॉन्स्टेबल माकर,पोलीस कॉन्स्टेबल तावरे कुमकर व चालक दिवेकर यांनी केली.

www.surajyadigital.com । मंगळवार, दि. २४ फेब्रुवारी २०२६ । ▸ वर्ष : २४ वे ▸ अंक : १४७ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२

अवकाळीचा तडाखा, शेतकरी धास्तावले

रब्बी पिकांसह द्राक्षे आणि आंबा पिकांची हानी; नांदेड,लातूर,धाराशिवमध्ये हाहाकार

सोलापूर/प्रतिनिधी

राज्यातून कडाक्याची थंडी गायब झाली असे वाटत असतानाच अचानक पुन्हा अस्मानी संकट या राज्यावर कोसळले. सोलापूर जिल्ह्यासह राज्याच्या अनेक जिल्ह्यांना सोमवारी दुपारी आणि सायंकाळी अवकाळी पावसाचा तडाखा बसला.सोलापूर जिल्ह्याच्या अक्कलकोट तालुक्यातील मैंदर्गी भागात गारपिट झाली तर दक्षिण सोलापूर आणि मंगळवेढा,पंढरपूर तालुक्यात चिंताजनकच पावसाच्या सरी पडल्या. सध्या सोलापूर जिल्ह्यात रब्बी पिकांची सुगी सुरू आहे.तसेच द्राक्षे हाताला आले आहेत.अशा स्थितीत अवकाळी हवामान तयार झाल्याने शेतकरी धास्तावला आहे.

दरम्यान नांदेडमध्ये अवकाळीने हाहाकार माजवला. बळीराजाची चिंता वाढली.लातूर व धाराशिव जिल्ह्यात अनेक ठिकाणी अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. काही भागांत गारपीटही झाली आहे. वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसाने शेतकऱ्यांचे हरबरा व अंबा पिकाचे मोठे नुकसान केले.

सोलापूर जिल्ह्यात गेल्या आठवडाभरापासून उन्हाचे चटके जाणवत आहेत. वाढत्या तापमानामुळे पावसाचा अंदाज व्यक्त होत होता.तो अखेर खरा ठरला.गेल्या दोन दिवसांपासून सोलापूर शहर आणि जिल्ह्यात ढगांची दाटीवाटी होती.सोमवारी अवकाळीचेआगमन झाले. दक्षिण सोलापूर,अक्कलकोट,मंगळवेढा ,पंढरपूर आणि सांगोला या भागात नोंद घेण्याइतपत पाऊस पडला.मोहोळ तालुक्यात केवळ पावसाचा शिडकावा झाला.सोलापूरसह जिल्ह्यात पहाटे थंडी तर दुपारी उकाडा जाणवत आहे.जिल्ह्यात ज्वारी,हरभरा,गहू या पिकांची सुगी सुरू आहे.कापणीतील पिक शेतातच आहे.अशावेळी अवकाळी आल्याने शेतकरी धास्तावला आहे.द्राक्षेही हाताला आले आहेत.त्यात वादळी वारा आणि पाऊस यामुळे द्राक्ष पिकांचीही हानी झाली आहे.

हवामान विभागाचा अंदाज खरा ठरवत किनवट तालुक्यासह नांदेड जिल्ह्यात अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. ऐन काढणीच्या टप्प्यात असलेल्या हरभरा, गहू आणि ज्वारी पिकांचे मोठे नुकसान झाले. किनवट तालुक्यात सायंकाळी ढगांच्या गडगडाटासह जोरदार अवकाळी पावसाने हजेरी लावली. या अवकाळी संकटामुळे हाताशी आलेला घास हिरावला जाण्याची भीती निर्माण झाली असून, संपूर्ण जिल्ह्यातील शेतकरी वर्ग हवालदिल झाला आहे.

रब्बी पिके संकटात

रविवारी रात्री १० वाजताही पावसाने तडाखा दिला होता. त्यानंतर पावसाने सोमवारीही सायंकाळी ४ वाजता अधिक जोरासह परत हजेरी लावली. सध्या किनवट तालुक्यात हरभरा काढणीचा हंगाम ऐन जोमात आहे, तर गहू, ज्वारी आणि मका ही पिके अंतिम टप्प्यात आहेत. अशा वेळी झालेल्या पावसामुळे उभ्या पिकांचे नुकसान होण्यासोबतच, शेतात कापून ठेवलेला हरभरा भिजल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

मैंदर्गी भागात गारपीट

अक्कलकोट तालुक्यातील मैंदर्गी भागात गारांचा पाऊस पडला.

कृषी विभागाने दिला इशारा

गारपीट झाल्यास हरभऱ्याचे घाटे झडण्याची आणि ओलाव्यामुळे गव्हाचे दाणे काळवंडण्याची शक्यता आहे. वाढीच्या टप्प्यातील मका पिकात पाणी साचल्यास खोड आडवे पडणे आणि पिकांवरील बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव वाढण्याची भीती कृषी तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. आधीच उत्पादन खर्च वाढलेला असताना आता निसर्गाच्या कोपामुळे पिकांच्या गुणवत्तेवर आणि उत्पादनावर परिणाम होणार हे निश्चित मानले जात आहे.

लातूर व धाराशिव जिल्ह्यात अनेक ठिकाणी अवकाळी

लातूर व धाराशिव जिल्ह्यात अनेक ठिकाणी अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. काही भागांत गारपीटही झाली आहे. वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसाने शेतकऱ्यांचे हरबरा व आंबा पिकाचे मोठे नुकसान केले.काढणीच्या अवस्थेत असलेला हरभरा पावसात भिजून खराब झाला असून अनेक ठिकाणी आंब्याच्या झाडांची मोठी हानी झाली आहे. काही भागांत झाडे उन्मळून पडल्याची माहिती शेतकऱ्यांनी दिली.

११ जिल्ह्यांमध्ये अलर्ट

मुंबई : महाराष्ट्रात पावसाची शक्यता व्यक्त केली जात आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार मंगळवारी मेघगर्जनेसह मध्यम ते हलक्या स्वरुपाचा पाऊस होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रातील एकूण ११ जिल्ह्यांत अलर्ट जारी करण्यात आला आहे. रविवारी रात्रीपासून वातावरणात बदल झालेला पाहायला मिळत आहे. हवामान विभागाने २३ तसेच २४ फेब्रुवारी अशा दोन दिवसात राज्यात अनेक ठिकाणी पाऊस होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली होती. २४ फेब्रुवारी रोजीदेखील राज्यातील सोलापूर, परभणी, हिंगोली, नांदेड, सातूर, धाराशीव, चंद्रपूर, गडचिरोली यासारख्या जिल्ह्यांत मेघगर्जनेसह पाऊस कोसळण्याची शक्यता आहे.

तज्ज्ञांचे मत काय?

तज्ज्ञांच्या मतानुसार अरबी समुद्र आणि बंगालच्या खाडीतून येत असलेल्या आर्द्रतेमुळे तसेच स्थानिक पातळीवर वाढलेल्या तापमानामुळे पावसाचे ढग तयार होत आहेत. यातूनच पाऊस बरसतो आहे.

५० टक्के आरक्षण ओलांडलेल्या झेडपीच्या निवडणुका लटकल्या

सुप्रीम कोर्टाचा मोठा निर्णय; राज्य सरकारची अनुमती अमान्य

नवी दिल्ली : महाराष्ट्रातील ५० टक्के आरक्षणाच्या मर्यादा ओलंडलेल्या स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुका घेण्यास सुप्रीम कोर्टाने मनाई केली आहे. राज्यात आता २२ जिल्हा परिषदा आणि त्याअंतर्गत येणाऱ्या पंचायत समित्यांच्या निवडणुका प्रलंबित राहणार आहेत.

महाराष्ट्राच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील ओबीसी आरक्षणावर सर्वोच्च न्यायालयात सोमवारी सुनावणी पार पडली. या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रलंबित निवडणूक घेण्यास परवानगी देण्याची मागणी राज्य सरकारकडून करण्यात आली होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने उर्वरित जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका घेण्यास मनाई केली आहे.

राहुल रमेश वाघ विरुद्ध केंद्र सरकार, महाराष्ट्र सरकार या मूळ याचिकेवर सुनावणी झाली. बांठिया समितीच्या अगोदर जी स्थिती होती, त्यानुसार निवडणूक घेण्याचे आदेश सुप्रीम कोर्टाने दिले होते. राज्य निवडणूक आयोगाने आरक्षण निश्चिती करताना ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडली गेली होती. काही ठिकाणी निवडणुका देखील पार पडल्या. २२ जिल्हा परिषद आणि या जिल्ह्यांमधील पंचायत समितीत आरक्षणाची ५० टक्के मर्यादा ओलांडली गेली होती. त्यामुळे या ठिकाणच्या निवडणुका घेण्यास स्थगिती देण्यात आली होती. राज्य निवडणूक आयोगाने १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुका पार पाडलेल्या आहेत. उर्वरित २२ जिल्हा परिषदांच्या आणि उरलेल्या पंचायत समित्यांच्या निवडणुका अनिश्चित काळासाठी प्रलंबित राहण्याची शक्यता आहे.

राज्यातील ५० टक्के आरक्षण मर्यादा ओलांडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर सर्वोच्च न्यायालयाने मनाई कायम ठेवली आहे. राज्य सरकारच्यावतीने तुषार मेहता यांनी अंतिम आदेशाच्या अधीन राहून निवडणूक घेण्यास परवानगी देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली होती. मात्र, सुप्रीम कोर्टाने अशी परवानगी देता येणार नसल्याचे म्हटले.

प्रलंबित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम आदेशाच्या अधीन ठेवून निवडणुका घेतल्या जाऊ शकतात, अशी भूमिका राज्य सरकारच्या वतीने तुषार मेहता यांनी मांडली होती. मात्र, सुप्रीम कोर्टाने निवडणुका घेण्यास परवानगी दिलेली नाही. बांठिया आयोगाने दिलेल्या ओबीसी आरक्षणाच्या वैधतेवर सर्वोच्च न्यायालय कधीपासून सुनावणी सुरू करणार याकडे लक्ष लागले आहे.

वकिलांना सूचना

ओबीसींच्या महाराष्ट्रातील राजकीय आरक्षणावर लवकरच अंतिम सुनावणीला सुरुवात होणार असल्याचे सुप्रीम कोर्टाने सांगितले आहे. अंतिम सुनावणी लवकर घेऊ अशी भूमिका सर्वोच्च न्यायालयानं घेतली आहे. अंतिम सुनावणी पूर्वतयारी पूर्ण करण्याचे सर्व वकिलांना निर्देश सुप्रीम कोर्टानं दिला आहे.

अध्यापक नियुक्तीवरुन कोर्टाने सरकारला फटकारले

मुंबई : महाराष्ट्रातील सुमारे ४२ शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयांमध्ये तीन ते दहा वर्षांपासून तासिका तत्त्वावर कार्यरत असणाऱ्या मात्र पूर्णवेळ आणि नियमित अध्यापकांच्या जबाबदाऱ्या पार पाडणाऱ्या अध्यापकांच्या याचिकेवर सुनावणी करतेवेळी सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला फटकारले.

राज्यातील तासिका तत्त्वावर नियुक्त अध्यापकांना नियमित करण्याची याचिका उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने नोव्हेंबर महिन्यामध्ये फेटाळली होती. त्याविरुद्ध संबंधित याचिकाकर्त्यांनी सर्वोच्च न्यायालयामध्ये धाव घेतली होती. महाराष्ट्रामध्ये शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयांमध्ये तासिका तत्त्वावर नियुक्तीवेळी संबंधित उमेदवारांना पूर्णवेळ सदर महाविद्यालयांमध्ये हजर राहण्याची अट घातली जाते. तसेच, सदर अध्यापकांवर पूर्णवेळ, कायमस्वरूपी व नियमित प्राध्यापकांकडून केल्या जाणाऱ्या कामाची जबाबदारी देण्यात टाकण्यात येते, ही बाब याचिका कर त्यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली.

तासिका तत्त्वावर कार्यरत असले तरी या अटी व जबाबदाऱ्यांमुळे हे अध्यापक इतर ठिकाणीही काम करू शकत नाहीत. त्यामुळे त्यांच्या रोजगार मिळवून पैसे कमवण्याच्या मूलभूत हक्काची पायमल्ली होते. तासिका तत्त्वावर नियुक्त अध्यापकांना या बदल्यात ताशी नाममात्र ४०० ते ८०० रुपये मानधन देण्यात येत आहे. याउलट नियमित प्राध्यापकांना समान कामाच्या मोबदल्यात दोन लाखांहून अधिक मासिक वेतन व इतर भत्ते आणि लाभ देण्यात येत आहेत. तासिका तत्त्वावर नियुक्त अध्यापकांच्या नियुक्तीपत्रातील पूर्णवेळ उपस्थितीच्या अटींवर बोट ठेवून सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला जाब विचारला.

T20 ICC MEN'S T20 WORLD CUP

आजचा सामना

इंग्लंड v/s पाकिस्तान

स्थळ : पल्लेकेल्ले, श्रीलंका
वेळ : सायंकाळी ७ वाजता

तिसरा डोळा

– प्रकाश पोरे

या बारीला उशीर केलास !

कल्याण
577-97-700

मुंबई
445-32-147

1 9 6

फटाके फोडण्यावरून हाणामारी, ग्रामीण रूग्णालयाची तोडफोड

▸ बार्शीत तणाव, २९ जणांविरूद्ध तक्रारींची नोंद

▸ गुंडगिरी करणाऱ्यांना सोडणार नाही, पोलीस अधीक्षकांचा इशारा

बार्शी/प्रतिनिधी

बार्शी शहरातील बारंगुळे प्लॉट परिसरात रविवारी रात्री उशिरा आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमादरम्यान फटाके फोडण्याच्या कारणावरून दोन गटात किरकोळ वाद झाला. त्यानंतर हाणामारी झाल्याने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. याबाबत सोमेश्वर दत्तात्रय स्वामी (वय २३ रा. बारंगुळे प्लॉट, बार्शी), ग्रामीण रुग्णालयाचे कर्मचारी राहुल सोलंकी, आणि स्टॅन्ड चौकातील घटनेवरून पोलीस कर्मचारी उदार यांनी बार्शी शहर पोलिसात १५ व अज्ञात १४ अशा २९ जणांविरुद्ध तक्रार नोंद केली आहे.

या घटनेनंतर शहरात रात्री उशिरापर्यंत अफवांना ऊत आला होता. त्यामुळे अनेक ठिकाणी तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. परंतु पोलिसांनी वेळीच परिस्थिती नियंत्रणात आणली व आवश्यक त्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त तैनात येण्यात करण्यात आला. रात्री उशिरा देखील जादा पोलिसांची कुमक मागविण्यात आली आहे. ग्रामीण रुग्णालयाची देखील मोठ्या प्रमाणात तोडफोड करण्यात आली आहे. तर एसटी स्टँड चौकात देखील रविवारी रात्री उशिरा साडे दहाच्या सुमारास काही समाजकंटकांनी दहशत माजवण्याचा प्रयत्न केला.

या घटनेची माहिती मिळताच जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी पोलीस उपाधीक्षक अशोक सायकर, पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांच्यासमवेत सोमवारी सकाळी बार्शी शहराला भेट देत घटनास्थळाची पाहणी केली. यावेळी बारंगुळे प्लॉट येथील स्थानिक नागरिकांनी घटनेची सविस्तर हकीकत पोलीस अधीक्षक कुलकर्णी यांना सांगितली. तसेच या गुंडांचा कायमचा बंदोबस्त करण्याची मागणी केली. यावेळी समाजात कायदा आणि सुव्यवस्था बिघडवत असणाऱ्या गुंडांना कोणत्याही परिस्थितीत सोडणार नसून त्यांना त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याचे आश्वासन यावेळी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी दिले.

या घटनेत रविवारी रात्री गाडेगाव रस्त्यावरील ग्रामीण रुग्णालयाचीही तोडफोड करत मोठे आर्थिक नुकसान केले. यात कोणत्याही रुग्णाला इजा मात्र झाली नाही. पोलिसांनी रविवारी रात्रीच सूत्र हलवत घटनेतील साजन शेख, शाहिद शेख, आरिफ सय्यद, अफरोज बागवान आणि मोजम बागवान (सर्व रा. बारंगुळे प्लॉट बार्शी) या पाच जणांना अटक करत न्यायालयात हजर केले होते. अजूनही इतर संशयितांचा शोध सुरु असल्याचे तपास अधिकारी व सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळासाहेब जाधव यांनी सांगितले.

यावेळी पोलीस अधीक्षक अशोक सायकर, पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक श्री. जगताप, पोलीस उपनिरीक्षक गोसावी, सपोनि प्रदीप झालटे, पोलीस उपनिरीक्षक महेश गळगटे हे परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत.

गुंडांची गय करणार नाही

पोलीस ठाण्यात शांतता कमिटीची बैठक घेताना पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी समाज बांधवांशी संवाद साधला. यावेळी ॲड. राजश्री डमरे, विहिंपचे बापू कदम,, अमर शुक्ला, श्री. देशमुख यांनी घडलेल्या घटनेबद्दल तीव्र खेद व्यक्त करत आरोपींना जास्तीत जास्त कडक शासन करावे, अशी मागणी केली. यावेळी पोलीस अधीक्षकांनी देखील या घटनेत समाविष्ट असलेल्या गुंडांना कोणत्याही प्रकारे अभय दिले जाणार नाही. त्यांना कडक शासन करण्याचा आमचा प्रयत्न राहील, तसेच या घटनेतील ज्यांच्यावर यापूर्वीच अनेक गुन्हे आहेत त्यांना तडीपार देखील केले जाईल, असे आश्वासन पोलीस अधीक्षकांनी दिले. तसेच सर्व प्रार्थना स्थळावरील भोंगे सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार काढून घ्यावेत, असे आवाहन त्यांनी केले.